# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत वर्धा रोड खापरी येथे शहर
**{प्रकल्प विभाग}** बस स्थानकाचे विकास व सौंदर्यीकरणाचे कामाबाबत मा.आयुक्त यांनी दि. 28/12/2022 ला रु. 3,99,80,678/- राशी च्या प्राकलनास मंजूरी प्रदान केलेली आहे.

या कामाकरिता रु. 3,99,80,678/- राशीला प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व निविदा मागविण्याच्या प्रश्न विचारात घेण्यास्तव मा. प्रशासक यांचे मान्यतेस्तव सादर.

टिप:-

1) प्रस्तृत कामाकरीता G- 20 परिषदेकरिता उपलब्ध होणाऱ्या निधीतून खर्च प्रस्तावित (शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्यास पद क्रं. A 28901341002 अंतर्गत खर्च करण्यात येईल).

2) सदर कामाकरीता मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.

3) सदर कामाकरीता मा. मुख्य अभियंता, यांची रु. 3,24,35,345/- राशीला दि. 26/12/2022 रोजीची तांत्रीक मान्यता प्राप्त आहे.

4) विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 238/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 28/12/2022**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत वर्धा रोड खापरी येथे शहर बस स्थानकाचे विकास व सौंदर्यीकरणाचे कामाबाबत मा.आयुक्त यांनी दि. 28/12/2022 ला रु. 3,99,80,678/- राशी च्या प्राकलनास मंजूरी प्रदान केलेली आहे.

या कामाकरिता रु. 3,99,80,678/- राशीला प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**